## प्रकरण ५

# - उपसंहार -

मराठी कवितेचे प्राचीन, अर्वाचीन (आधुनिक) व 'नंव' असे स्थूलपणे विभाग पाडले जातात. हे विभाग कालवाचक आहेत, तितकेच ते गुणवाचक किंवा जातिवाचकही आहेत. यातून बदलत्या कालप्रवृत्ती इतकेच बदलत्या कलाप्रवाहांचेही सूचन होते.

प्राचीन मराठी कविता ही संत कविता होय. या काळातील कवींनी प्रामुख्याने आध्यात्मिक विषयावर काव्यलेखन केले आहे. संतानी ईश्वरविषयक प्रेम अति उत्कट स्वरुपात उच्चतम पातळीवरुन व्यक्त केले आहे. ही रचना मधुराभक्ती काव्य म्हणून ओळखली जाते. ज्ञानेश्वरांच्या पूर्व काळात महानुभावीय कवींनीदेखील श्रीकृष्णभक्तीपर काव्यरचना केली आहे. पुढे संतकवितेनंतर शाहिरी काव्य आले. ज्यामध्ये मानवी भावनांचा उघड-उघड आविष्कार झालेला दिसतो. प्रेमाची भावना स्वत:ची म्हणून त्यांनी उघड केली आहे. इंग्रजी आणि इतर भाषातील (हिंदी, उर्दू, अरबी) वाड्मयाच्या वाचनामुळे मराठी कवितेचे स्वरुपही बदलत गेले. केशवसुतांनी बदलत्या स्वरुपाची वेगळी कविता लिहिली. ते आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून ओळखले गेले. आध्यात्म विषयाखेरीजच्या विविध मानवी भावभावना, निसर्ग, सामाजिक घटना, परंपरा, रुढीविषयक विचार या सर्वांनाच त्यांच्या कवितेत स्थान मिळाले. नंतरच्या काळात अनेकांनी अशा प्रकारची कविता लिहिली.

आजच्या कवितेच्या क्षेत्रात बरीच अनिश्चितता दिसून येते. कवितेमध्ये कळत न कळत अनेक प्रयोग झाले. वादळे निर्माण झाली, उलट-सुलट मते प्रतिपादली गेली, नवकवींनीच या क्षेत्रातील काही दोष दाखविले तर नवकवितेवर परखड टीका करणाऱ्यांनी या कवितेतील काही गुणांचा निर्देश केला. आजच्या एकंदरीत जीवनालाच फार वेग आला आहे. सर्वच क्षेत्रात गती, परिवर्तन, प्रगती फार लौकर होऊ लागले आहे. पूर्वीच्या कवितेत मानव व त्याची असामान्य कृत्ये आदर्श म्हणून समाजासमोर ठेवली जात. ती कविता रसिकसापेक्ष असे, समाजप्रबोधन व भावनोद्दीपन हे तिचे साध्य होते. त्या कवितेत वृत्त कौशल्य, अलंकार योजना, व्याकरण शुध्दता, आकलन सुलभता इत्यादी घटक महत्वाचे मानले जात. आजची कविता ही पूर्वीच्या सौंदर्यकल्पनेहून व आविष्कार तंत्राहून खूप वेगळी आहे. आविष्काराच्यापध्दती सूक्ष्म

स्वरुपात पण हळूहळू बदलतच असतात. प्रत्येक कवीची अनुभव घेण्याची आणि अनुभव अभिव्यक्त करण्याची पध्दत यामध्ये बदल सुक्ष्मरीत्या होत असतात. यमक, अनुप्रासादी छंदांचे बंधन न घेता गेयतेला फारसे महत्व न देता फक्त भावनेची अभिव्यक्ती महत्वाची मानणारी, शब्दातील अंतर्गत लय सांभाळणारी मुक्त छंदात्मक कविता अवतरली, कवी अनिलांनी मुक्तछंदाचा हिरीरीने पुरस्कार करुन कविता लिहिली. त्यांचे अनुकरण करणाऱ्या अनेकांनी मुक्तछंद आपलासा केला आणि नवकविता जन्मली.

मागील साठ वर्षाच्या काळात केशवसुत आणि त्यांने अनुकरण करणारे कवी, गोविंदाग्रज आणि त्यांचे समकालीन, रविकिरण मंडळाचे कवी, कवी अनिल बा.भा.बोरकर आणि कुसुमाग्रज यांच्या कवितेपेक्षा बा.सी. मर्ढेकरांच्यापासूनची कविता पुष्कळच वेगळी आहे. मर्ढेकरांच्या प्रमाणेच पु.शि.रेगे, म.द. भावे, दिलिप चित्रे, इंदिरा संत, वसंत बापट, विंदा करंदीकर याही कवींनी नवकविता लिहून काव्याच्या प्रांतात मोलाची भर घातली आहे.

नवकाव्याचे प्रवर्तक म्हणून मर्ढेकरांचा उल्लेख केला जातो. त्यांची कविता मुक्तछंदात्मक आहे मात्र त्यातून व्यक्त होणारी जाणीद पूर्वीच्या इतर कवींपेक्षा अनेक बाबतीच निराळी आहे. शिवाय तिची भाषादेखील निराळीच आहे. म्हणून असे म्हणावे वाटते की आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही संदर्भानी नवकविता वेगळीच ठरते.

नवकवितेत आत्मपरता, स्वप्नाळूपणा आणि पलायनवाद यांचा अभाव आहे. ती जीवनातील वास्तवाला भेट भिडणारी आहे. तिच्यात कल्पनारम्यता नाही. अर्थात यासाठी देशात आणि देशाबाहेर घडलेल्या अनेक घटना कारणीभूत आहेत. जीवनाला भिडणाऱ्या या कवितेत कृत्रिमता, सांकेतिकता, भावूकता नाही मात्र तिला ठाम असे वैचारिक अधिष्ठान आहे. नवकवींनी फ्राइडच्या मानसशास्त्राचा आधार घेऊन मानवी मनातील भावभावनांचे, अंतरमनाचे पदरही अलगदपणे उघडून दाखवले आहेत. साहजीकच नवकाव्यात अनेकदा मानवी मनाच्या विरुपतेचे भिषण दर्शनही घडते. नवकवींनी आपल्या भावाभिव्यक्तीसाठी अनेकदा नवप्रतिमांचा वापर केलेला दिसतो. या नवप्रतिमा आणि अबोध मनाच्या हालचाली टीपणारी सांकेतिकता नसणारी गद्यसदृष्य रचना यामुळे नवकविता प्रारंभीच्या काळात तरी दुर्बोधच वाटली. उत्तर काळात मात्र दुर्बोधता जावून नवकाव्य पुष्कळच लोकप्रिय झाले. नवकवितेला छंद व अनुप्रासाचे बंधन नाही, मात्र अंतर्गत लय महत्वाची असते.

मर्ढेकरांच्यापासून नव्याने सुरु झालेला हा नवकाव्याचा प्रवाह उत्तरकाळात मोठ्या जोमाने आणि विस्तारीत स्वरुपात वाहताना दिसतो. याच प्रवाहाला पुढे ग्रामीण कविता, दलित कविता, विद्रोही कविता हे प्रवाहही येवून मिसळलेले दिसतात. १९६० पर्यंत नवकाव्याची दोन प्रवर्तने घडून येवून तिला स्थैर्य प्राप्त झाले. या नवकाव्याची संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी प्रातिनिधीक स्वरुपात सहा नामवंत नवकवींच्या काव्य वैशिष्ट्यांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

मराठी साहित्यात नवतेची चिन्हे मर्ढेकरपूर्व कालापासूनच दिसत होती, परंतु तिचा स्फोटक आविष्कार झाला तो मर्ढेकरांच्या कवितेतून, मर्ढेकरांच्या कवितेला एवढे मोल चढण्याचे कारण म्हणजे मर्ढेकरपूर्व काळातील मराठी कवितेची मरगळलेली स्थिती, अत्रे यांच्या झेंडूच्या फुलांनी आणि कुसुमावती देशपांडे सारख्यांच्या समीक्षेने मर्ढेकरपूर्व काळातील कवितेचे पितळ उघडे केले होतेच. स्वत: मर्ढेकरांनीही 'वाङमयीन महात्मता' या आपल्या पुस्तकातून (१९४१) तत्कालीन कवितेत आत्मनिष्ठेचा कसा अभाव आहे, हे विस्ताराने विशद केले होते. त्यांचे वेगळेपण प्रत्ययाला आला ते या टीकेमुळे; पण त्यांना नवकवी म्हणून जी मान्यता मिळाली ती मात्र त्यांच्या 'काही कविता' या १९४७ च्या काव्यसंग्रहाने. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'शिशिरागम' १९३९ सालीच प्रसिध्द झालेला होता पण त्यात आशयाभिव्यक्तीची तेवढी नवी वळणे नव्हती. त्यादृष्टीने त्यांचा दुसरा 'काही कविता' व १९५१ मध्ये प्रसिध्द झालेला तिसरा 'आणखी काही कविता' हे संग्रह विशेष महत्वाचे मर्ढेकरांचे हे दोन काव्यसंग्रह व त्यांनी वेळोवेळी प्रकट केलेले वाङमयविषयक नवे विचार या सर्वांचा सारभूत परिणाम म्हणजे मराठी साहित्यात वाङमयनिर्मितीची, त्याच्या आकलनाची व आस्वादनाची अस्तित्वात आलेली नवी परिमाणे, घडविले गेलेले सौंदर्यशास्त्र. म्हणूनच मर्ढेकरांना केशवसुतांप्रमाणेच युगप्रवर्तक म्हणून ओळखले जाते. जुन्या कोणत्याही कवीचे अनुकरण न करता त्यांनी स्वतंत्रपणे मुक्तछंदात आणि नाविन्यपूर्ण अशा वेगळ्या प्रतिमांचा वापर करुन काव्यलेखन केले आहे. त्यांची स्वत:ची निश्चित अशी वेगळी काव्यशैली जाणवते. काही काळ त्यांच्या अपरिचित प्रतिमा आणि कल्पनाचित्रे यामुळे ती कविता दुर्बोध वाटली तरी पुढे त्यातून त्यांनी रसिकांच्या आस्वादनक्षमतेला केलेले आवाहन समिक्षकांना जाणवले. समिक्षकांच्या रसग्रहणातून वाचकांना त्यांची कविता वेगळी असल्याचे कळाले. उत्तरकाळात रसिकांनाही ती कविता कळू लागली, रुचली. अशी वाचकांच्या बुध्दीची कसोटी पाहणारी कविता मर्ढेकरांनी लिहिली.

मर्ढेकरांच्या कवितेत यंत्रयुगाने निर्माण झालेली मानवी जीवनातली यांत्रिकता आणि दुसऱ्या महायुध्दामुळे बदललेले सामाजिक वास्तव यांचे संदर्भ मोठ्या प्रमाणात आलेले आहेत. म्हणूनच त्यांची कविता एक अनोखे, वेगळे काव्यविश्व घेवून आली आहे असे म्हणता येते. तसेच आजच्या सर्वंकष अंधाराला, विरुपतेला, अभद्रतेला आजच्या परिभाषेतून मर्ढेकरांइतक्या, भेदकपणे अन्य कोणीही वाचा फोडली नाही. नवकवितेची पहाट फुटल्याची जी सार्वत्रिक जाग आली ती मर्ढेकरांच्या कवितेतील विशिष्ट प्रकारच्या काळोख्या आशयातून मर्ढेकरांच्या जीवनविषयक जाणिवा कितीही उपरोधपूर्ण कडवट वा तिरक्या असल्या तरी चाचपडत का होईना पण मर्ढेकर कुठल्यातरी एका श्रेय कल्पनेच्या आसपास वावरतात.

मर्ढेकरांची कविता प्रामुख्याने आत्मकेंद्रित भावना व्यक्त करणारी आहे. त्यामुळेही काही प्रमाणात ती दुर्बोधतेकडे झुकलली आहे. तथापी कवीची वृत्ती सौंदर्यलक्ष्री असल्यामुळे त्यांनी रंगवलेली जी शब्दचित्रे रस, रुप, गंधादी संवेदना व्यक्त करतात.

मर्ढेकरांच्या कवितेत वास्तवाच्या जोडीने अस्तित्ववादाचे दर्शन घडते. मात्र अनेकदा कवीला जीवनाची अर्थहिनता, मूल्यहिनता जाणवते आणि मग त्यांची कविता निराशवादी सूर आळवू लागते. जीवनातील विसंगती, वैफल्य, निराशा सांगता सांगताच ते वास्तवाचा वेध घेतात. यंत्रयुगामूळे सामान्यांच्या जीवनात आलेली कृत्रिमता कवीला अस्वस्थ करते. सगळा उपरेपणा त्यांनी निर्भय फटकळपणाने व्यक्त केला आहे. ते एक प्रयोगशील कवी होते. त्यांनी मराठी कवितेची परिभाषाच बदलून टाकली आणि त्यात नविनतेची संजिवनी ओतली. वाङ्मयीन महात्मता सांगून सौंदर्यशास्त्राचे नवे सिध्दांत मांडले तसेच समिक्षाक्षेत्रातही मोलाची भर घातली.

कवी शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी प्रामुख्याने साम्यवादी जाणीवेने भरलेली कविता लिहिली. केशवसुतांपासून सामाजिक जाणीव हा काव्याचा विषय असला तरी मुक्तिबोधांची मानवता वेगळी असून प्रारंभी त्यांच्यावर अनिलांचा प्रभाव असल्याचे जाणवते. त्यांच्या कवितेत मर्ढेकरांच्या कवितेप्रमाणे जीवनातील विफलतेच्या अंधाराचे चित्रण असले तरी या विफलतेवर व मानवतेला मारक ठरणाऱ्या गोष्टीवर मात करुन भविष्यकाळाबद्दलचा आशावादी सूर हे त्यांच्या कवितेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

नवकवींशी जवळीक असणारे व सौंदर्यवादी कवींमध्ये स्वतंत्र स्थान निर्माण करणारे कवी म्हणून पु.शि.रेगे यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या कवितेत विलक्षण आत्मनिष्ठा आहे. स्वत:ला केंद्रस्थानी कल्पूनच ते कवितेला व तिच्या घटकांना स्वत:भोवती पिंगा घालायला लावतात. रेग्यांनी अतिशय समर्थपणे स्त्रीचित्रे रंगविले आहेत. इतर निसर्गकवी निसर्गप्रतिमांमध्ये मानवी भाव शोधतात, रेगे मात्र मानवी प्रतिमांमध्ये निसर्गसौंदर्य शोधतात. स्त्री देह आणि निसर्ग यांच्यातील ऐक्य त्यांनी अत्यंत तरल आणि संवेदन पध्दतीने दाखविले आहे. रेग्यांची कविता रवीकिरण मंडळाच्या रुळलेल्या वाटेने न जाणारी किंवा मर्ढेकरी नवकवितेचा भाग न धरणारी स्वतंत्र पिंड जोपासणारी आहे. अत्यंत नि:संकोचपणे रेग्यांनी शृंगारचित्रे रंगविली आहेत. रेगे कल्पकतेने कवितेला ऐंद्रिय अनुभवाच्या पातळीवर पाठवतात. रेग्यांची सुखलोलूप वृत्ती आणि मोहशील स्वभाव अनेक कवितातून व्यक्त झाला आहे. एकूणच मर्ढेकर, मुक्तिबोध आणि रेगे यांच्या काव्यातून मराठीतील नवकवितेची गंगोत्री त्रिवेणीरुपाने जोमदारपणे वाहू लागली.

नवकवितेच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात होत असताना विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, वसंत बापट यांचे मोलाचे सहकार्य लाभले. करंदीकरांच्या कवितेवर कवी मर्ढेकरांची छाप असली तरी माणसाच्या अस्तित्वाबद्दल त्यांना कधीही प्रश्न पडत नाही. ते निराशवादी मुळीच नव्हते. त्यांचा पारंपारिक भारतीय मुल्यांवर, विज्ञानावर आणि मानवतेवर विश्वास आहे.

'माझ्या मना बन दगड' असे म्हणत सामाजिक अन्याय अत्याचाराचे वाभाडे ते काढतात. प्रयोगशिल नाविण्य भावनेची उत्कटता या अंगानी विंदांनी मराठी कवितेला पुढे नेले आहे.

वसंत बापट यांची प्रवृत्ती मुक्तछंदाला जवळची असून त्यांच्या लावण्यात शाहिरी बाज, ढंगदारपणे रंगवल्याचे दिसत असले तरीसुध्दा त्यांचा समावेश नवकवीत होतो याचे कारण म्हणजे कवितेच्या नव्या स्वरुपाविषयीची जाणीव त्यांच्या काव्यातून प्रत्ययास येते. सामाजिक, राजकिय जाणीवेचे त्यांना प्रथमपासूनच भान आहे. त्याचबरोबर शृंगाराच्या हळुवार छटा त्यांनी नव्यानेच रेखाटल्या आहेत. प्रामुख्याने ते समाजवादी विचारसरणीचे कवी असल्याने त्यांची कविता समाजाची सुखदु:खे निष्ठेने मांडते.

इंदिरा संतांचा समावेश नवकाव्याच्या दुसऱ्या पर्वात विशुध्द भावकविता लिहिणारी कवयित्री म्हणूनच केला जातो. प्रत्यक्ष अनुभुतीचा क्षण आणि स्मृतीतील गतजीवन यांच्या मिलाफाने व्यामिश्र प्रतिमांकन ही इंदिरा संतांच्या प्रत्येक कवितेची वैशिष्ट्ये आहेत. तरल व मधुर संवेदनांची सतत जाणीव त्यांच्या ठिकाणी आहे. स्त्रीसुलभ भावभावनांचा सुयोग्य वापर करुन त्या भावनेची अभिव्यक्ती करतात, त्यात कुठेही भडकपणा नाही. त्या निसर्गाची जवळीक करतात. त्यामुळे त्यांची कविता अधिक भावपूर्ण झाली आहे. त्यांची प्रतिमा अनुभवांशी एकरुप होऊनच येत असल्यामुळे त्या अधिक प्रभावी होतात. जातीवंत विशुध्द भावकविता हे त्यांच्या कवितेचे खास वैशिष्ट्य होय.

दिलीप चित्रे हे पराकोटीची आत्मनिष्ठा असणारे कवी आहेत. आशय अभिव्यक्तीच्या नव्या वाटा ते चोखाळतात. मात्र आत्मभावाची तीव्रता त्यात अधिक असते. त्यांच्या कवितातून रोमँटिक प्रतिमेबरोबरच चिंतनात्मक, भावात्मक प्रतिमाही येतात. काही कवितातून सामाजिक वास्तवाचे भान मोठ्या विदारकपणे प्रत्ययाला येते. चित्र्यांची कविता वास्तवाला सामोरी जाते. स्त्री-पुरुष संबंधातील थेटपणा, मळमळ व्यक्त करणारे चित्रे पहिलेच कवी आहेत.

वरील कविंच्या कवितेशी मंगेश पाडगांवकरांच्या कवितचे जवळचे नाते आहे. ते इतर कवींपेक्षा अधिक आशावादी आहेत. अत्यंत संवेदनशील मनाने त्यांनी अनुभव टिपले आहेत. पाडगांवकर निसर्गाशी संबध्द कवी आहेत. त्यामुळेच त्यांचे बोरकर आणि बालकवींशी नाते आहे. तरल, कोमल निसर्गसंवेदना आणि कोवळ्या नाजूक प्रेमभावनेच्या छटा याचा कवीला अत्यंत हव्यास आहे. नाजूक भावभावनांची सुक्ष्म अशी शब्दचित्रे त्यांनी काढली आहेत. 'वात्रटीका' हा हलक्याफुलक्या विनोदी वळणाच्या कविता आणि गझल हे काव्यप्रकारही त्यांनी हाताळले आहेत. पण पाडगांवकरांचा मुळ पिंड कोमल भावभक्तीचा आणि मन सौंदर्यलक्षी असल्यामुळे त्यांची कविता सहज सुंदर आविष्कार करणारी, जीवनाबद्दल आशावादी असणारी आहे.

निसर्गाचे वेड हा कवी पाडगांवकरांचा स्थायीभाव आहे. असे म्हणावे वाटते इतके निसर्गाचे आकर्षण त्यांच्या कवितेत दिसून येते. त्यांच्यावर बालपणी झालेल्या संस्काराचा, त्यांच्या मनात दडून असलेल्या जिप्सीचा, अंगभूत स्वप्नांचा, त्यावर होणाऱ्या संस्काराचा व

माणूसपणाच्या एकवट रसायनाचा आणि स्वायत्त संवेदन प्रकृतीचा एकत्रित परिणाम पाडगांवकरांच्या निसर्ग कवितेवर झालेला दिसतो.

निसर्गसौंदर्याचा ध्यास घेतलेल्या पाडगांवकरांना गूढ अज्ञाताचा शोध निसर्गातच घ्यावासा वाटतो. निसर्गाने आपले गुपित दडविण्याचा कितीही प्रयत्न केला तरी कवीचे सौंदर्यवेडे मन या गुपिताचा शोध घेतच राहते. असा शोध घेताना कवीला कधी वेदनेचा तर कधी उदासीनतेचा अनुभव घ्यावा लागतो. आशा-निराशा अशी संभ्रमावस्था होते. मात्र मधूनच कधीतरी तमाची ओढणी गळून पडते. निराशेतून आशेकडे धावणाऱ्या मनात जीवन जगण्याबद्दलचा विश्वास निर्माण होतो. मौनावर शब्दांची प्रतिमांची लेणी खोदत बसणे सुध्दा आनंदाचे वाटते. गूढ अज्ञाताची अंतर्मनाला कुठेतरी ओळख पटलेली असते.

पाडगांवकरांची रुप रंग गंध लयालेली निसर्गकविता वाचतांना अनकवेळा बालकवीच्या कवितेचे स्मरण होते. दोघांनाही पंचेंद्रियाना तृप्त करणारा निसर्ग भेटला आहे. पाडगांवकरांचे गाणे निसर्गातील सृजन साक्षात्कारातून जन्मलेले आहे. भूमीचा स्तर भेदून वर आलेले हिरवेगार इवलेसे पाते हा निसर्गाचा चमत्कार म्हणजेच सृजनाचा सत्कार आणि नवनिर्मितीची प्रेरणा आहे याची कवीमनाला साक्ष पटते. 'मरण विरघळे अमरपणात' असे म्हणणारी ही कवीवृत्ती 'का मरणी अमरताही ना खरी' या तांब्याच्या कवीवृत्तीला सामोरी जाणारी आहे. अंधारातच प्रकाश आहे ही तांब्याची आशावादीवृत्ती पाडगांवकरांच्या ठिकाणीही आहे. म्हणूनच पृथ्वी आणि आकाशाच्या मीलनाने सृजनाचे अमर नाते तृणपात्यात उमललेले पाहून पाडगांवकरांच्या श्रध्दा एकवटून येतात. निसर्गातच ते परमेश्वराचे रुप पाहतात. या अपार निसर्गप्रीतीमुळेच पाडगांवकर निर्मळ निसर्गसुक्ते गातात. निसर्गाच्या सानिध्यामुळे उत्फूर्तपणे आलेले गाणे आनंदाची बरसात करते. मात्र कधी कधी याच निसर्गाच्या सानिध्यात कवीचे मन अतिशय कष्टी होते. मनात व्याकूळ उदासीनता भरुन जाते. रात्रीच्या घन अंधारी सर्वच गूढ, गहन वाटत असतानाच शब्दाशिवाय रंगगंधातून निसर्गाचे कोडे सहज उकलते.

पाडगांवकरांच्या निसर्गकवितेत सर्वत्र आपल्याला कवीचे आशावादी मन आणि सकारात्मक दृष्टीकोण दिसून येतो. "खिन्न आंधळा अंधार आता ओसरेल पार लहरीत किरणांची कलाबूत मोहरेल आता उजाडेल" असे कवी सांगतो. प्रकाश कणिका काळोखातच विरलेल्या पाहून मन उदास होते असतानाच दूर कूठेतरी लाल केसरी जाळ दिसतो आणि पहाटेची आठवण

देऊन उदासीनतेला पळवून लावतो. मनावरचा ताण हलका होतो कारण 'काळोखाला येती नक्षत्रांचे कोंब' अशीच कवीची श्रध्दा आहे. त्यामुळे त्याच्याठिकाणी जगण्याची नवी प्रेरणा जागी होते.

जगण्याबद्दलची नवी उमेद अशी निसर्गातून मिळण्याचे कारण कवीला निसर्गातच ईश्वराचा साक्षात्कार होतो. कवीला ऋतुत, फळाफुलात, माती-आकाशात सर्वत्र ईश्वर दिसतो. रुपगंधातून, चराचरातून त्याची जाणीव त्याच्या मनाला होते. एवढेच नव्हे तर पृथ्वीवरील जीवांच्या संघर्षातून, व्यथातून, भोवतालच्या मानवतेतही कवीला ईश्वर रुपाच्या विविध खुणा दिसतात.

माती हेच जीवनाचे अंतिम सत्य आहे याची प्रतीती निसर्गभक्तीमुळेच त्यांना येते. ब्रह्माची पूजा करणाऱ्यांनी या जगाला मिथ्या ठरविण्याचा मूर्खपणा केला; पार्थिवता नाकारली. परंतु परित्यक्त मेनकेसारखी पार्थिवता ऐश्वर्याच्या सौंदर्याचे शांकुतल घेऊन उभी राहिली. ती सृजनशीलतेच्या स्वागतासाठी अशा पार्थिवतेचे सूक्तपाठ गाताना आपण एक आनंदयात्रिक आहोत हा साक्षात्कार कविमनाला होतो. पार्थिवता म्हणजे सृजनशक्तीचा अपूर्व साक्षात्कार अशी श्रध्दा ठेवून तिचा जयजयकार करणारे पाडगांवकर मराठी नवकवितेत प्रथमच दिसतात. म्हणूनच पाडगांवकरांच्या कवितेचे मराठी काव्यविश्वात स्वागत झाले. निसर्गाचा म्हणजेच पार्थिवतेचा गौरव करणारा हा कवी वेगळाच वाटतो. निसर्गाचा भक्त बनून तो त्याच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतो.

पाडगांवकरांची 'जिप्सी' मधील प्रेमकविता ही विशुध्द भावकविता आहे. सौंदर्यलक्षी मनाच्या पाडगांवकरांची ही कविता वाचकाच्या चित्तवृत्ती पुलकीत करते. रसिकाच्या काळजाला भिडते. त्यातील उत्कट भाव, संवेदनाशील मन रसिकाचे मन व्यापून टाकून त्याला एक वेगळाच आनंद देते. पाडगांवकरांनी अत्यंत संवेदनाशील मनाने प्रियकर प्रेयसींच्या मनाच्या विविध भाववृत्ती हळुवारपणे अभिव्यक्त केल्या आहेत.

आकाशाच्या अथांगतेचा शोध घेणारा, चैतन्यावरुन आपला जीव ओवाळून टाकणारा कवी चार भिंतीत जसा गुंतत नाही, तसा तो प्रेमपाशात गुंतून राहणेही पसंत करत नाही.

पाडगांवकरांच्या कवितेतील प्रेयसी ही स्वप्नविलासात दंग होणारी नाही. आपल्या सौंदर्यविभ्रमांनी त्याला गुंतून टाकणारी नाही. तिची तऱ्हाच वेगळी आहे. देवापुढे जळणाऱ्या नंदादीपासारखी ती आहे. तिच्या अबोलपणातच त्याच्या प्रीतीच्या चैतन्याचा झरा आहे. प्रेयसीरुपी साथीदाराकडील निर्मळ मार्दवच कवीला हवे आहे. त्यात प्रमत्त यौवन दडलेले असेल. शुभ्र प्रकाश देणाऱ्या चांदणीप्रमाणे तिने आपले लाघव मार्दव देत रहावे अशी अपेक्षा पाडगांवकरांचा प्रियकर व्यक्त करतो. यंत्राप्रमाणे रुक्ष झालेल्या जीवनात तिने मंत्राप्रमाणे यावे, नवनवीन रुपे घेत यावे, पहाटेच येणार असेल तर धुके होऊन किंवा हिरव्या तृणावर अलगद निथळणाऱ्या दवाप्रमाणे यावे आणि आपल्या प्रियकराशी एकरुप व्हावे. तिच्या डोळ्यात खोलवर बुडताना त्याला स्वत:चे परकेपण जाणवते. शिशिरातल्या गूढ पहाटे समुद्र धुक्यात बुडून जावा तसे ते क्षण होते अशी प्रांजल कबुली प्रियकर देतो.

तांबे, बोरकर आणि पाडगांवकर यांचे स्त्रीकडे पाहण्याचे दृष्टीकोण वेगळे आहेत. तांबे यांच्या प्रेमकवितेत त्यांना सुखावणारी प्रेयसी म्हणजे त्यांची साधीसुधी प्रिय पत्नी, नंतर ते तिला गृहिणीच्या रुपात पाहातात व नंतर त्यांना ते ती देवता भासते. तर काही अंशी बोरकरांची प्रेयसीविषयक भावना अशीच आहे. जिवाभावानं प्रेम करणारी स्त्री ही आपली सरंक्षक आणि संजीवक देवता आहे अशी बोरकरांची श्रध्दा आहे. प्रेमाची साधना प्रेमाला जपण्यात आहे, ही बोरकरांची श्रध्दा पाडगांवकरांच्या ठिकाणीही आहे. पण तिचे रुप वेगळे आहे. नवथर प्रेम झाकण्याचा तिचा प्रयत्न बालीश आहे. तिच्यात असणाऱ्या अजाणपणामुळे तिचे लाघव गुंतवणारे आहेत.

पाडगांवकरांच्या काही प्रेमकविता विरहाची व्याकुळता व्यक्त करतात. त्यात प्रेयसीचे व्याकूळ मन, प्रियकराची प्रेयसीच्या भेटीसाठी होणारी तगमग, प्रेयसीच्या मनाची घालमेल, हुरहुर आली आहे. तिच्या प्रेमाची निकड प्रियकराला तीव्रपणे जाणवते. 'तू असतीस तर झाले असते गडे उन्हाचे गोड चांदणे' असे तो सांगतो.

प्रेमाच्या विविध तरल अवस्था कधी अनुभवतो आणि तितक्याच तरलपणे त्या शब्दात टिपतो. हा तरल प्रेमानुभव टिपण्यास कवीची तितकीच तरल शब्दकळा व तरल प्रतिमासृष्टी सहाय्यभूत होते. भडक प्रेमभावनेला पाडगांवकरांनी हळुवार, नाजूक, तरल व गतिमान केले. प्रेमातील रसरसत्या संवेदना टिपून मराठीतील प्रेमकवितेला निसर्गाचे भान

पाडगांवकरांच्या प्रेमकवितेने दिले. समंजस, सौंदर्यलक्षी, भावस्पर्शी प्रेमकविता म्हणून ती रसिकांच्या दृष्टीसमोर उभी राहिली. त्यांनी प्रीतीचे भावदर्शन अतिशय समर्पक निसर्गप्रतिमा वापरुन घडविले आहे. कवीच्या निसर्गप्रतिमांचे आवरण इतके पारदर्शक आहे की कवितेचे मूळ नितळरुप झाकले जात नाही. 'गंधातून गुढ उकलते' या कवितेत तिने न बोलता सुध्दा त्याला तिच्या सर्व भावभावना समजतात.

यंत्राप्रमाणे रुक्ष झालेल्या जीवनात तिने मंत्रासारखे यावे त्यामुळे जीवन अखंड नूतन होईल असे त्याला वाटते. जलधारातून भिजत ये असे तिला सांगून दोघांचे मीलन 'जमीन काळी मातला अंधार' अशा निसर्गदृश्यातून कवी व्यक्त करतात. 'दोघांच्या छाया एकरुप आपुल्या' या प्रतिमेतून दोघांचे मनोमीलन सूचकपणे व्यक्त होते.

प्रेयसीचे एकाकी, उदास, विरहाने व्याकूळ झालेले मन कवीने शिशिरातल्या उत्तररात्री झुकणारे आकाश, उदास वारा, दवाची कोवळी फुले ढाळणे अशा निसर्गाच्या शब्दचित्रातून दाखविले आहे. तिच्या आठवणींच्या ज्वाळा एकाकी दुपार जाळू लागतात. आसवात भिजलेली ही कथा तिला सांगायचे राहून जाते. त्यांचा प्रियकर शरीर मीलनापेक्षा मनोमीलनास अधिक उत्कुक आहे. कधी कधी त्यात तो समाधानी आहे. 'पांघरुण' या कवितेत हळव्या पण स्वाभिमानी प्रेयसीचा अनुभव शब्दांकित झाला आहे. एका रात्री त्याची वासना तिला आंधळी रानटी वाटते. ती त्या झिडकारते. पण पहाटे जाग आल्यावर त्याच्या निस्सीम प्रेमाची ओळख पटते आणि तिच्या मनाचे अडसर गळून पडतात.

प्रियकराने आपले मोठेपण विसरुन धुक्यातून मला शोधत दवबिंदू होऊन यावे. इतकेच नाही तर त्याने हसत सहज फुलवावे आणि मी नकळत फुलावे, तु तुलाच विसरुन यावे आणि मी तुझ्यात मज विसरावे असे ती सांगते. विवाह बंधनात इतकी आत्यंतिक एकरुपता तिला हवी आहे. अर्थात प्रियकर व प्रेयसी दोघांनाही आपले स्वत्व जपण्याची इच्छा आहे. ती त्याचे स्वप्न असली तरी स्वप्नाचे दान देऊन माझी जाग मागू नको असे तो स्पष्ट बजावतो. तू मागशील ते मी जरुर देईन तरीही माझे पंख तू मागू नको असेही तो सांगतो.

पाडगांवकरांनी रंगविलेली ही प्रीती समंजस आणि डोळस आहे. तेजाकडे प्रकाशाकडे झेपावताना, निसर्गाशी जवळीक साधताना त्याची गरज आहे. लौकीक भावजीवना इतकेच

कलात्मक जीवनही प्रत्येक व्यक्तीला आवश्यक आणि हवेसे वाटणारे आहे. सप्त सुरांची वीणा मधुर आवाज करते. त्यात तारांची एकरुपता आलेली असते. हे जरी खरे असले तरी त्यासाठी दोन तारांमध्ये अंतर असणेसुध्दा तितकेच आवश्यक असते. तेव्हा जवळपणाचे बंधन न होण्यासाठी दक्ष रहावे असे पाडगांवकरांचा प्रियकर सुचवितो.

कवी मंगेश पाडगांवकरांनी आपल्या कवितेतून जीवनातील चैतन्याचे गीत गाइले आहे. कवीची जीवनावर अपार श्रध्दा आहे. तसेच जीवनाबद्दल त्यांना प्रचंड ओढ आहे. त्यामुळे भावनेच्या जोशात ते जीवनाची गाणी गातात. हा जोश शब्दाशब्दातून रसिकाच्या मनाची सहज पकड घेतो.

कवी हसत जीवन जगणारे आहेत. त्यामुळे पायीचे कंटक काढून, दु:खांना पचवून पुढे गेले पाहिजे. अंधार पिऊन चांदण्याचा वर्षाव करण्यातच पुरुषार्थ आहे असे कवीला वाटते. त्यामुळे दु:ख स्विकारुन प्रकाशाचे गाणे गाणारे आनंदयात्री ते होतात. या सृष्टीच्या कणाकणात सौंदर्यतराणे आहेत म्हणूनच आपल्या ओठावर गाणे आहे अशी पाडगांवकरांची निष्ठा आहे. ही माती हा निसर्ग हेच सत्य असल्याच्या प्रतीतीमुळे कवी पार्थिवतेचा गौरव करतात.

पाडगांवकर आशावादी आहेत. म्हणूनच अंधारातून प्रकाशाकडे, निराशेकडून आशेकडे धावणारे मन त्यांच्याठिकाणी जगण्याबद्दलचा विश्वास निर्माण करणे.

कवीच्या भावविश्वात अज्ञाताचा शोध घेणारी, सौंदर्याच्या पाऊलखुणा शोधणारी जी वृत्ती आहे तिचेच नांव 'जिप्सी' आहे. 'एक जिप्सी माझ्या मनात खोल आहे दडून' असे सांगतानाच या जिप्सीमुळेच अनेकदा मनाची तगमग कशी होते हे कवींनी 'दु:ख' मध्ये मांडले आहे. घरट्याचा लोभ, जगण्याची प्रीती आणि गगनाची ओढ यातून जन्मलेले विचित्र दु:ख घरट्याच्या रुपकातून ठळकपणे व्यक्त झाले आहे.

एखाद्या संध्याकाळी उरल्या सुरल्या प्रकाशकणिका काळोखात विरल्यामुळे उदासीनता वाढते. मात्र लाल केशरी जाळ क्षितिजावर दिसतो. त्यातून पहाट होणार असल्याचा आशावादी संदेश कवीला मिळून उदासीनतेचे पटल गळून पडते. मातलेला अंधार-काळ्या जमीनीला घट्ट कवळतो आहे या पाडगांवकरांच्या निसर्गानुभवाला मीलनाची तृप्तता आहे. आशेचे भावांकुर आहेत. सृजनाचे स्वप्न आहे. म्हणूनच काळोखाला नक्षत्रांचे कोंब येतात.

पाडगांवकरांच्या काही कवितेत खिन्नता, निराशा पंख छाटलेल्या पाखरासारखी अंधारावर पसरलेली दिसते. अशावेळी कवी आपल्या मनाला शांत स्तब्ध राहण्याचे आवाहन करतो. ही एकाकीपणाची अवस्था जास्त काळ रहात नाही. कारण अंधाराला ज्याक्षणी नक्षत्रांचे नाते कळते त्या क्षणाला भूमीचा स्तर भेदून हिरवे गवत पाते वर येते. आकाशाने आपले मीपण विसरुन धरेला दृढ अलिंगन दिलेले असते. मातीचे लवून चुंबन घेताच हे परिवर्तन आकस्मित घडते. निसर्गातला हा गंधीत क्षण कवीच्या जीवनात असाधारण ठरतो. हिरव्या तृणात उसळलेल्या इवल्या फुलाची कहाणी सांगताना जीवनशक्ती किती आणि कशी श्रेष्ठ आहे हेच सांगतात. पहिल्या हिरव्या तृणपात्याचा अत्यंत उत्कटतेने सत्कार करतात. हा सत्कार म्हणजे सृजनशीलतेचा गौरव असतो. चैतन्याचे स्वप्न मूर्तिमंत साकार होणे हाच जीवनशक्तीचा विजय आहे. हे हिरवे कौतुक सृजनाचा विजयध्वज आहे. म्हणूनच कवी पार्थिवतेचा जयजयकार करतात.

पाडगांवकरांना जीवनातील चैतन्य भावते ते चराचर सृष्टीच्या विविध रुपातून. या चैतन्यमय रुपात त्यांना परमेश्वर दिसतो. त्यांच्याशिवाय मानवाचे जीवन सिध्द होऊ शकत नाही अशी पाडगांवकरांची श्रध्दा आहे. जसे पाडगांवकर निसर्गात परमेश्वर पाहतात. त्याचप्रमाणे स्वत:मध्येही डोकावून पाहतात. 'कधी पाहतो' यासारख्या कवितेतून मानवासंदर्भातले हे आत्मचिंतन प्रगट झाले आहे. एकाच माणसात 'दानव' आणि 'विराट मानव' असे दोघेही दडून कसे बसलेले असतात हे कवी सांगतात. जीवन जगताना आपण आपल्याशीच संवाद साधून योग्य मार्ग निवडायचा असतो. संवाद साधण्यामुळे दानवरुपी विद्रुपता नाहिशी होते, जगण्याची नवी चांगली प्रेरणा प्राप्त होते मग धुक्यातसुध्दा रस्ता चुकत नाही. म्हणूनच दैनंदिन व्यवहारी जीवन जगताना माणसाने आत्मसंवाद साधावा असे कवी सुचवतात. मात्र व्यावहारिक जीवन जगत असताना कित्येकदा माणसे दु:खी होतात; खऱ्या आनंदापासून वंचित राहतात आणि ही चूक जेंव्हा उमगते तेंव्हा पश्चाताप होतो. मग 'कैफ चढून रंगलो नाही, जगून सुध्दा जगलो नाही' असे म्हणण्याची वेळ येते. असे एका बाजुला वाटत असले तरी जीवन जगण्याची तारेवरची कसरत प्रत्येकाला करावीच लागते. त्यामुळे खूप काही करण्याची धडपड चालूच असते. धुंद टाळ्या, धुद हसणे स्वीकारत दु:ख पचवून इतरांना सुखी आनंदी करण्यासाठी धडपड जीवनाची वाटचाल चालू असल्याचे कवी सांगतात.

अशा प्रकारे 'जिप्सी' या काव्यसंग्र आधारे केलेल्या अभ्यासातून मंगेश पाडगांवकर हे सौंदर्यलक्षी नवकवी असल्याचे लक्षात येते. इतर नवकवींच्या प्रमाणेच अनेक नव्या नव्या सुंदर प्रतिमा पाडगावकरांनी वापरल्या आहेतच. जसे प्रीतीच्या ओल्या आठवणींचा उल्लेख "खिडकीच्या भिजलेल्या काचा" प्रेयसीचे एकाकीपण व्यक्त करण्यासाठी "अंधाराच्या कुशीत विचित्र पक्षी", प्रियकर प्रेयसी यांच्या मध्ये एकरुपता असली तरी त्यांचे व्यक्तीमत्व स्वतंत्रच असले पाहीजे. हे सांगताना विणेच्या तारांची प्रतिमा ते वापरतात. कारण विणेच्या तारांतून मधुर सुर निघायचे असेल तर त्या तारांमध्ये अंतर हे असावेच लागते. "अंधुक दिसणारी दुर जाणारी पायवाट " कवीचे आशावादी मन व्यक्त करते. "भिजलेला पक्षी, दुरवर दिसणारे दिवे, कौलातून बाहेर येणारा धुर "या प्रतिमांतून जीवनाचे स्वागत आनंदाने करणारी वृत्ती दिसून येते. "कोवळे आकाश लाटात दाटणे अंधुक तारां चमकणे" या प्रतिमा कवीला नवीन कल्पना सुचताना जाणवतात. "दोघांच्या छाया एकरुप आपल्या " या प्रतिमेतून दोघांचे मनोमिलन व्यक्त होते. यासारख्या कितीतरी प्रतिमा कवी वापरतात.

पाडगावकरांची कविता मुक्तछंदात्मक आहेच. तसेच त्यांच जीवनाकडे पाहण्याचा आशावादी दृष्टीकोन रसिकाला भावतो प्रेमभावनेच्या संदर्भातसुध्दा कवी अत्यंत व्यवहारदक्ष भावनाशील आणि डोळस असल्याचा प्रत्यय येतो त्यांच्या प्रियकर प्रेयसीला स्वत्व जपून परस्परासाठी जगणे एकरुप होणे पसंत आहे. कवी निसर्गावर भरभरुन प्रेम करतात. तथापी निसर्ग कुणी गुरु आहे, देव आहे असे माणून त्याच्याकडून धडे घ्यावेत अशी कवींची भावना आहे. कवींना निसर्गातच ईश्वराचा साक्षात्कार होतो. निसर्गाच्या सृजनशीलतेचा पार्थिवतेचा ते भरभरुन गौरव करतात. त्यांची कविता अशी वेगळेपणाने उठून दिसणारी, रसिकाला भावनाशी अशी सुंदर कविता आहे.



BAR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR